International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.6 July – Aug 2022

# निजामकालीन शेतकरी शोषणात सरंजामशाही संरचनेची भूमिका

**श्री. नागवे कृष्णा अण्णासाहेब**
पीएच.डी. संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद
*Corresponding Author-* **श्री. नागवे कृष्णा अण्णासाहेब**
Email- kanagwe@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7070922

**सारांश**

शेती हा निजामकालीन अर्थव्यवस्थेचा पाया होता. शेती आणि शेतकरी लोक यांची संख्या मोठ्या प्रमाणावर होती. पण राजकीय इतिहास रेखाटतांना शेतकरी, शेतमजूर आणि शेती या घटकाकडे दुर्लक्ष होतांना दिसते. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे ही भूमिका सर्वांना मान्य आहे. शेतकरी ह्या दुर्लक्षित गटाचा इतिहास लिहिणे अत्यंत आवश्यक आहे. सरंजामशाही रचना, तिचे परिणाम, त्यांचा शेतकरी जीवनावर होणारा परिणाम, जहागीरदारी, वतनदारी आणि राज्याच्या जमीन महसूल प्रशासनाचे व धोरणाचे शेतकरी जीवनावर होणारे परिणाम प्रस्तुत लेखातून मांडण्यात आले आहे.

**संशोधनाचा उद्देश:**

1. निजामकालीन सरंजामशाही प्रशासकीय रचना आणि तिचे स्वरूप समजून घेणे.
2. सरंजामी व्यवस्थेचे घटक समजून घेणे.
3. शेतकरी जीवनावर जाहगिरदारी, वतनदारी आणि इतर सरंजामी व्यवस्थेचे होणारे परिणाम समजून घेणे.

**गृहीतके:**

1. निजामकालीन प्रशासनाचे स्वरूप सरंजामी स्वरूपाचे होते.
2. सरंजामदार हे निजामाच्या सत्तेचे आधार होते.
3. सरंजामी रचनेचा शेतकरी जीवनावर वाईट परिणाम होत होता.

**संशोधनपद्धती:**

प्रस्तुत संशोधनामध्ये ऐतिहासिक विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करणायत आलेला आहे.

निजामकालीन राज्य हे सरंजामशाही स्वरूपाचे राज्य होते. तत्कालीन हैद्राबाद राज्यात मराठवाडा, कर्नाटकचा काही भाग आणि तेलंगनाचा काही भाग इत्यादी भागाचा समावेश होता. जमीन महसूल हा तत्कालीन निजामी अर्थव्यवस्थेचे मूळ होते. हा जमीन महसूल वसूल करण्यासाठी त्या त्या भागातील शक्तिशाली आणि नामांकित व्यक्तीची निवड करण्यात यायची. जेणेकरून महसूल वसूल करण्यात कोणतीही अडचण निर्माण होणार नाही. सरंजामशाही उतरंड ही येथील महसूल वसुलीत महत्वाची होती. कारण केंद्रीय सत्तेच्या पंखांना बळ देण्यात या सरंजामी व्यवस्थेचा महत्वाचा वाटा होता. जागतिक पातळीवर मजूर आणि भांडवलदार यांच्यातील संघर्ष कार्ल मार्क्स यांनी मांडला. पण निजाम राज्यात शेतकरी आणि जमीन महसूल गोळा करणारे सरंजामदार हे शोषक आणि शोषित ह्या भूमिकेत निजाम राज्याला पाहणे आवश्यक आहे. निजाम राज्यात वरकड शोषण करणारे वतनदार, जमीनदार आणि जागीरदार यांच्याकडून होणारे शोषण हे अत्यंत निंदनीय होते. सरंजामशाही व्यवस्था आणि तिचे स्वरूप जाणण्यासाठी हैद्राबाद राज्यात निर्माण झालेल्या सरंजामी व्यवस्थेला समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. संस्थानाच्या सोळा जिल्ह्यांपैकी आठ जिल्हे तेलंगणातील होते. या तेलंगणमध्ये शेतीची रचना जमीनदारी पद्धतीची होती. म्हणजे मूठभर जमीनदारांच्या मालकीची हजारो हेक्टर जमीन होती. गावेच्या गावे एकेका जमीनदाराच्या मालकीची होती. बाकी त्यांचे सर्व शेतमजूर वेठबिगार अथवा कुळे होती.[१]

मराठवाडा हा मराठी भाषिकांचा, कर्नाटक हा कन्नड भाषिकांचा, तेलंगणाचा भाग तेलगु भाषिक लोकांचा होते. निजामकालीन हैद्राबाद राज्यातील मराठवाडा भाग ज्यामध्ये तत्कालीन औरंगाबाद, बीड, परभणी, नांदेड आणि उस्मानाबाद या पाच जिल्ह्याचा समावेश होता. त्या भागात सरंजामशाही पद्धती विकसित झाली होती. सरंजामशाहीमध्ये अपेक्षित असते ते म्हणजे वरकड शोषण करणारी उतरंड. निजाम राज्यातील लोक हे जमीन महसूल

देण्यासाठी हैद्राबाद राज्याला जबाबदार होते. इंग्रजाना निजाम सत्तेला आपल्या अधीन करण्यासाठी निजामच्या केंद्रीय सत्तेचे विभाजन हे विविध जागीरदार, जमीनदार आणि सरंजामदार, वतनदार, पाटील, कुलकर्णी यांच्याकडे होणे त्यांच्या फायद्याचे वाटत होते. हा उद्देश साध्य करण्यासाठी निजाम सत्तेच्या सरंजामी स्वरूपाला टिकवणे महत्वाचे होते.

निजाम सरकारने महसूल प्रश्नाच्या सोयीसाठी अनेक जागीर निर्माण केल्या होत्या. जहागीरदार आणि वतनदार हेच निजाम राज्य टिकवण्यात महत्वाचे होते. राज्याचा ५६ टक्के भूभाग दिवाणी अंतर्गत, ३२ टक्के भूभाग हा पायगा व जहागिर अंतर्गत आणि १० टक्के भाग हा सर्फेखास अंतर्गत येत होता.[२] जहागिरदारी, वतनदारी आणि इतर अनुदाने देऊन आपल्या राज्याला एक सुरक्षाकवच निर्माण करणे हे महत्वाचे उद्दिष्ट निजाम सरकारचे होते. राज्याची आर्थिक मजबुती आणि संकटाच्या काळात लष्करी मदत हे दुहेरी उद्दिष्ट या सरंजामी व्यवस्थेमुळे शक्य होते. जहागिरी भूभाग हा अत्यंत मागासलेला होण्याच्या पाठीमागे जहागिरी अंतर्गत होणारे शोषण होय. सरकारचा हिस्सा देण्याबरोबरच पेशकश आणि नजराणा यांच्या माध्यमातूनही अधिकचे शोषण स्थानिक जमीनदार किंवा जाहगिरदार करत होते. त्याचबरोबर बरचसे तालुके हे अलत्मगा जहागिर, जात जाह्गीर, मक्ता इत्यादी अंतर्गत विभाजित करण्यात येत.[3] जहागीरदार हा त्या भागातील प्रशासक होता. त्याच्या अन्यायाविरुद्ध न्याय मिळण्यात अनेक अडचणी होत्या. तो राज्याचा नोकर आणि आर्थिकदृष्ट्या सामर्थ्यशाली व्यक्ती होता. त्यामुळे त्याचा आपल्या भागात वचक असे.

तत्कालीन जहागिरी ह्या पारंपारिक पद्धतीने चालत होत्या. जहागिरीत जहागीरदाराचे नियम चालत. शेतकरी वर्गाचे शोषण करणे आणि महसुलाचे अपहरण करणे हे नित्याचीच बाब होती. जहागीरीतील प्रशासन चालवणे पूर्णतः जहागिरदाराच्या इच्छेवर अवलंबून होते. केंद्रीय सरकार आणि जनता यांच्यात मध्यस्थ म्हणून त्यांची भूमिका महत्वपूर्ण होती. जहागिरदाराची लहर हीच कृपा मानली जात. ‘निजामाने निर्माण केलेल्या जहागिरी कमालीच्या बुरसटलेल्या, अन्याय, शोषणपद्धतीचा अवलंब करणाऱ्या होत्या. जहागिरी असलेल्या भागातील प्रशासन नाममात्र, जहागिरदारांच्या लहरीप्रमाणे चालत.[४]

शेतकरी हा निजामकालीन अर्थव्यवस्थेचा आधार असला तरी त्याचे शोषण होत होते आणि त्याच्या शोषणात वरील सरंजामी व्यवस्था ही महत्वाची होती. निजामी शासनात मध्यस्त अधिकारी हे शोषणात महत्वाचे होते. शेतीचा कर घेण्याचा अधिकार निजाम सरकार जोपासत मात्र शेतकरी आणि शेती यांच्या हिताची काळजी घेण्याची जबाबदारी सरंजामी व्यवस्थेतील लोकांवर सोडली जात मात्र महसूल गोळा करणे आणि त्याचा ठरलेला भाग ठेऊन उर्वरित भाग स्वतःच्यासाठी वापरणे याशिवाय हे जमीनदारी, जागीरदारी प्रशासन कोणतेही कार्य करत नसत. संपूर्ण प्रशासकीय रचना ही भ्रष्ट होती आणि शेतकरी वर्ग हा सर्वांना महसूल देणारा एक घटक होता. “संपूर्ण प्रशासकीय उतरंड ही शेतकरी वर्गाचे शोषण करणारी होती आणि शेतकरी हा सर्वांसाठी देणारा.[५] जहागीरदारदारांप्रमाणे संस्थानात वतनदार देखील महत्वाचे होते. ‘गावाकरिता किंवा देशासाठी करीत असलेल्या कर्तव्यबद्दल त्या व्यक्तीच्या उपजीविकेकरिता, मानमरातब राखण्यासाठी आणि जनतेचे दिलेले व वंशपरंपरेने चालणारे उत्पन्न म्हणजे वतन. यात चाकरी, वृत्ती, अधिकार, हक्क, नेमणूक यांचा अंतर्भाव होतो व हे हक्क आणि तदानुषंगिक कर्तव्ये उपभोगण्याची राजमान्य आणि लोकमान्य पद्धत म्हणजे वतनसंस्था होय.’ [६]

शेतकरी वर्गाच्या शोषणात वतनदाराची भूमिकाही महत्वपूर्ण होती. या वतनदारांमध्ये पाटील. कुलकणी, देशमुख, सरदेशमुख, देशपांडे, सरदेशपांडे आणि महाजन असे अनेक वतनदार होते ज्यांचा निजामाच्या महसूल प्रशासनात आणि सामर्थ्यात मदत होत होती. वतनदार आपल्या ताब्यात येणाऱ्या गावात किंवा वतनात महसूल, पोलीस आणि न्यायदानाचे कार्य देखील संपन्न करीत होते. ‘जहागिरदाराप्रमाणे वतनदार आपल्या कार्यक्षेत्रात शेतकरी व प्रजेचे आर्थिक शोषण करीत तसेच शेतसारा वसुलीसाठी प्रसंगी मारहाणही करीत.’[८] राज्यातील वतनदार, जमीनदार व जहागीरदार हे शेतकरी वर्गाच्या द्रव्याचे अपहरण निजामाच्या वतीने करत होते. मग या लढ्यात सरंजाम विरुद्ध जनता असेही या संघर्षाचे स्वरूप असायचे. ‘वतनदार, जमीनदार व जहागीरदार हे निजामाच्या बाजूचे आणि सामान्य शेतकरी कुळे म्हणजे प्रजा ही निजामाच्या विरुद्ध.’[९]

उपरोक्त सर्व बाबी आणि शेतकरी शोषणाचा परिणाम म्हणून शेतकरी वर्गात असंतोष निर्माण झाला. परिणाम म्हणून निजामकाळात अनेक शेतकरी बंडे झाली आणि ती बंडे शमविण्यासाठी सरकारला

लष्करी मदत घ्यावी लागली. शेतकरी वर्गाचा हा असंतोष नंतर हैद्राबाद मुक्तिसंग्रामात या आंदोलनाचा आधार बनला.

**संदर्भसूची:**


1. https://vishwakosh.marathi.gov.in/33800/
2. खड्केकर, बा.शं.(२०१४). हैद्राबाद मुक्तीलढ्याची जडणघडण (प्रथम आ.). नांदेड: इसाप प्रकाशन, पृ. क्र. १६.
3. Rao, C.V.S. (1951). A Review of Hyderabad Finance (First Ed.). Hyderabad: Finance Department Hyderabad Government, Government presss, page No. 129-130.
4. मेदककर, प्रकाश.(२००३). महाराष्ट्राचे शिल्पकार स्वामी रामानंद तीर्थ (प्रथम आ.). मुबई: महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पृ. क्रं. ०३-०४
5. Rao, C.V.S. (1951). A Review of Hyderabad Finance (First Ed.). Hyderabad: Finance Department Hyderabad Government, Government press, page No. page No. 19
6. https://mr.vikaspedia.in/social-welfare/93893e92e93e91c93f915-93890291593294d92a92893e-935-93890291c94d91e93e/93592492893890293894d92593e
7. मेदककर, प्रकाश.(२००३). महाराष्ट्राचे शिल्पकार स्वामी रामानंद तीर्थ (प्रथम आ.). मुबई: महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पृ. क्रं. ०३-०४
8. कठारे, अनिल व वाघमारे, महादेव.(२००६). हैदराबाद स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाड्यातील दलित समाज (प्रथम आ.). नांदेड: कल्पना प्रकाशन, पृष्ठ क्र. १९
9. कुरुंदकर, नरहर.(१९९८). हैदराबाद विमोचन आणि विसर्जन (द्वितीय आ.). नांदेड: रजत प्रकाशन, पृ. क्र. १८४